जगभर

# अन्नाची टंचाई

## पुरन्दरे चन्द्रशेखर

***Global Network against Food Crises* या संस्थेने जागतिक अन्न टंचाईचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्याचा संक्षिप्त आढावा लेखात घेतला आहे.**

अहवाल मुख्यत: २०२१च्या देशोदेशीच्या उपलब्ध आकडेवारीवर आधारित आहे. जेथे आकडेवारी उपलब्ध किंवा ग्राह्य नसेल, त्या देशांनी जर आंतरराष्ट्रीय संघटनांकडे अन्नासाठी मदतीची मागणी केली असेल, तर ते देशही त्यात समाविष्ट आहेत. २०२२ मध्ये भुकेने कायम ग्रस्त असणाऱ्या लोकांची संख्या आधीच्या पाच वर्षांपेक्षा अधिक आहेच पण २०२१ च्या संख्येपेक्षा २५ टक्केने वाढली आहे. पाच वर्षात ही संख्या ८० टक्केने वाढली. या गंभीर परिस्थितीची कारणे अनेक आहेत. युद्धे, अंतर्गत संघर्ष यांमुळे निर्वासित व अंतर्गत विस्थापित, नैसर्गिक प्रकोप, देशाची वेगवान आर्थिक घसरण, वगैरे. आज जगाची लोकसंख्या ८ अब्ज, तिची वाढही या टंचाईला कारणीभूत आहे. अनेक प्रदेशात यातील काही घटक आधीपासून होते, ते आणखी तीव्र झाल्याने लोकांची त्यावर मात करण्याची क्षमता उतरोत्तर कमी होत गेली.

### टंचाईची क्रमवारी

अहवाल चढत्या क्रमाने टंचाईची पहाणी करतो. या पाच श्रेणी आहेत.

पहिल्या श्रेणीतील लोकांना अत्यावश्यक अन्नाची आणि अन्नाखेरीज गरजा भागवण्यासाठी अनुचित मार्गांचा अवलंब करावा लागत नाही. पण या लोकांची संभाव्य संकटापासून वाचण्याची क्षमता वाढवणे जरुरीचे आहे.

दुसरी श्रेणी टंचाईच्या तणावात असते. त्यांची अन्नाची किमान गरज भागते पण अन्नाखेरीजच्या काही गरजा भागत नाहीत. त्यासाठी त्यांना ताण वाढवणारी कामे करायला लागतात. एकूण ४१ देशांतील साडे–तेवीस कोटी. यातील निम्याहून जास्त लोक पाच देशांत आहेत – काँगो चार कोटी, नायजेरिया साडेतीन कोटी, इथिओपिया पावणे दोन कोटी, सुदान दीड कोटी आणि अफगाणिस्तान सव्वा कोटी. या श्रेणीतील लोकांची संख्या २०२० पेक्षा २०२१ ला तेरा टक्केने वाढली, तर २०१६ पासून १७० टक्केने वाढली. यांची उपजीविका शाबूत ठेवणे आवश्यक आहे.

तिसऱ्या श्रेणीतील लोकांना खायला पुरेसे मिळत नाही. त्याचा परिणाम कमी–जास्त तीव्रतेच्या उपासमारीत होतो. किंवा असे लोक घरातील चीज–वस्तू विकून अन्नाची गरज भागवतात. तेरा कोटीहून जास्त लोक यात आहेत, प्रामुख्याने काँगो, नायजेरिया, अफगाणिस्तान, इथिओपिया आणि येमेन. यांना पुरेसे अन्न मिळणे आवश्यक आहे.

चौथ्या प्रकारच्या लोकांची उपासमार तीव्र असते. त्याचा परिणाम भूकबळी – प्रसंगी मृत्यूत – होऊ शकतो. राहती जागा, असलीच तर शेतजमीन अशी जी काही 'मालमत्ता' असेल, ती अन्नासाठी विकण्याची त्यांच्यावर वेळ येते. जगातील ३६ देशांत सुमारे तीन कोटी नव्वद लाख लोक या श्रेणीत आहेत. यातील पाच देशांत प्रत्येकी २५ लाखाहून जास्त लोक आहेत. अफगाणिस्तान – ८७ लाख, काँगो ६७ लाख, येमेन – ५१ लाख, इथिओपिया – ४३ लाख आणि सुदान – २७ लाख. सीरियाचे केवळ अंदाज आहेत, पण तेथे २५ लाख लोक या श्रेणीत असावेत. २०२० च्या तुलनेत २०२२ ला एका वर्षातच उपासमारीने ग्रस्त लोकांची संख्या काँगोमध्ये सहापट तर अफगाणिस्तान आणि इथिओपियात जवळजवळ दुप्पट झाली. यांची उपजीविका निश्चित करणे व त्यांना जीवंत ठेवणे महत्त्वाचे आहे.

पाचव्या आणि अतिशय बिकट परिस्थितीतील लोकांना विकाऊ माल विकूनही अन्नान्न दशा येते. जगातील चार देशांत मिळून ५ लाख ७० हजार लोक या श्रेणीत आहेत, त्यातील चार लाख इथिओपिया देशात तर एक लाखाहून जरा जास्त दक्षिण सुदान देशात. येमेन व मादागास्कर देशांत प्रत्येकी काही

हजारात. २०२२ ला या देशांमध्ये अंतर्गत यादवी, आर्थिक अवनती आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे आधीच्या सहा वर्षांपेक्षा ४० टक्के अधिक लोक ग्रस्त झाले. सुदान आणि येमेनमध्ये परिस्थिती २०१६–१८ पासून झपाट्याने खालावत आहे. विस्थापन, कमालीची उपासमार आणि त्यामुळे भूकबळी असा क्रम असतो. अशा लोकांची उपजीविका पुन्हा सुरू करणे व मृत्युदर कमी करणे तातडीचे आहे.

**आंतरराष्ट्रीय मदत**

जगातील एकूण मानवतावादी (humanitarian) मदतीच्या ८४ टक्के मदत अन्न टंचाईने ग्रस्त देशांना मिळते. हे प्रमाण सर्व प्रकारच्या एकूण जागतिक मदतीच्या एक–तृतीयांश आहे. २०२० ला तोपर्यन्तच्या पाच वर्षात भुकेल्या लोकांची संख्या सतत वाढत होती तरी त्या ५५ देशांना आधीच्या पाच वर्षांपेक्षा कमी मदत मिळाली. २०१७ पासून ही मदत कमी होत आहे. २०२०ला मदत ८ अब्ज डॉलर्स होती. ती २०१७ ला २५ टक्के जास्त होती. मदतीची कपात प्रामुख्याने येमेन व सीरिया या देशांना होणाऱ्या मदतीत झाली. त्याबरोबरच कृषी क्षेत्र आणि उपजीविकेसाठी होणारी मदत २०१६ पासून निम्यावर आली.

एकूण आणीबाणीच्या अन्न टंचाईने ग्रासलेल्या लोकांची संख्या २०१६ला ४ कोटीपेक्षा जरा कमी होती. ती २०२० ला चार कोटी ३० लाख झाली.

**अन्न टंचाईची प्रमुख कारणे**

**युद्ध व असुरक्षितता**: ही परिस्थिती जेथे असते, तेथील बहुतांशी लोकांवर टंचाईची कुऱ्हाड पडते. जगात असे २४ देश आहेत. अशा लोकांची संख्या २०१८ला साडेसात कोटीहून कमी होती, ती २०२१ ला १४ कोटी झाली. त्यातही तीन देश प्रमुख – इथिओपिया, दक्षिण सुदान आणि येमेन. तेरा देशांत चौथ्या आणि पाचव्या प्रकारच्या टंचाईने ७५% लोकसंख्या ग्रासली होती. या संकटात भर म्हणून, जेथे हे दोन घटक होते, त्या देशांत नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक घसरणही झाली. त्यामुळे मर्यादित नैसर्गिक संसाधनांवर हक्क आणि रोजगार यासाठी स्पर्धा वाढली. कोविदमुळे २०१९–२० ला १७ देशांत ही परिस्थिती अतिशय बिकट झाली. २०२२ ला त्यात थोडी सुधारणा झाली पण मिळकत कमी होणे, अन्न–धान्य व इंधन महाग होणे हे आर्थिक परिणाम ४८ देशांत कायम राहिले. २०२१ ला नैसर्गिक आपत्ती तीव्र झाल्या, अन्न टंचाईचे ते महत्त्वाचे कारण झाले.

**हवामानातील बदल**: २०२१ला मुख्यत: दुष्काळाने आफ्रिकेतील आठ देशांत अडीच कोटी लोकांवर अन्न टंचाई आली.

**अंतर्गत विस्थापन**: जगातल्या २४ देशांतील एकूण पाच कोटी अंतर्गत विस्थापितांतील ६६ टक्के लोक अन्नाच्या टंचाईने विस्थापित झाले. ते सुरुवातीला जरी स्थानिक संघर्षामुळे, युद्धामुळे विस्थापित झाले असले, तरी हे संघर्ष मिटल्यावर ते वर्षानुवर्षे विस्थापितच रहातात.

**सत्तीने विस्थापन**: बलिष्ठ समूह अनेकांना त्यांच्या पारंपरिक वसतीस्थानातून हुसकावून लावतात. अशी वेळ बऱ्याच ठिकाणी लोकांवर वारंवार आलेली आहे. अशा विस्थापितांची अन्न टंचाई वाढते. अफगाणिस्तान, येमेन, काँगो वगैरे देशांत २०–२१ मध्ये मोठ्या प्रमाणावर असे विस्थापन झाले.

या लोकांना आणखीच हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. विस्थापित शेतकरी, गुरे पाळणारे समूह यांची उपजीविकाच संपुष्टात येते. नव्या देशांतील बंधनांमुळे संचार स्वातंत्र्य संपते, शेतजमीन मालकीची सोडाच पण शेतमजूर म्हणूनही मिळत नाही, नोकऱ्या, आर्थिक संस्थांशी संपर्क करणे अशक्य होते. त्यांच्या समस्यांना आर्थिक मदत अगदीच तुटपुंजी मिळते. जगण्यासाठी त्यांचा कर्जाचा बोजा व त्यांच्यातील बालमजुरी वाढतात. ज्या तात्पुरत्या कॅम्पमध्ये त्यांना वसवलेले असते तेथे मूलभूत नागरी सुविधांचा अभाव असतो – पाणी, अन्न, आरोग्यसेवा, वगैरे. यामुळे स्त्रिया व मुलांना किमान आवश्यक पोषक आहार मिळत नाही.

**निर्वासित**: निर्वासित आणि परदेशी आश्रय मागणारे लोक हे अन्न टंचाईचे बळी होतात. जगभर २०२१ मध्ये एकूण दोन कोटीहून जास्त निर्वासित होते तर ४० लाख लोकांनी दुसऱ्या देशात आश्रय मागितला. हे लोक प्रामुख्याने अशा ५२ देशांत गेले जेथे आधीच अन्न टंचाई होती. त्यांच्या आगमनाने स्थानिक संघर्ष, असुरक्षितता, कोविद आणि गरीबी वाढली. त्यात

नैसर्गिक आपत्तीही आल्या. निर्वासितातील बहुतेकांनी मायदेशीच्या अन्न टंचाईमुळे देश सोडला होता.

### लहान मुलांवरील परिणाम

अन्न टंचाईचा लहान मुलांवर अतिशय घातक परिणाम होतो. जगात पाच वर्षाखालील अडीच कोटीहून जास्त मुलांची वाढ कुपोषणामुळे खुंटलेली आहे. पन्नास लाख मरणासन्न आहेत. ११ देशांत प्रत्येकी दहा लाखांहून जास्त मुले कुपोषित आहेत. परत इथिओपिया ४२ लाख, अफगाणिस्तान ३१ लाख, सुदान २६ लाख, येमेन साडे– तेवीस लाख हे प्रमुख देश.

२०२१ ला आफ्रिकेतील मोठ्या भागात युद्धे, दुष्काळ चालू राहिले. त्यामुळे पिके नष्ट झाली, मिळकत कमी झाली आणि अन्न–धान्याच्या किमती वाढल्या त्याचा परिणाम मुलांच्या कुपोषणात झाला, कोविददरम्यानच्या निर्बंधांमुळे कुपोषणाची वेळेवर वैद्यकीय तपासणी, उपचारही अशक्य झाले.

### नजीकचे भविष्य

वर उल्लेख केलेल्या पाच श्रेणीतील दोन ते पाच यातील लोकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. अधिक युक्रेनच्या युद्धामुळे निर्माण झालेले प्रश्न – निर्वासित व जगाचा धान्यपुरवठा परिस्थिती आणखी बिकट करतील.

artnondeco@yahoo.co.uk
purandarearts.com